**विषयः- कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना करणेबाबत. (जिल्हयातील सर्व बँकातुन अनुदान व पीक विमा वाटप दिनांक ३१.०३.२०२० पर्यंत बंद ठेवणेबाबत)**

## जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

क्र.२०२०/आपत्ती व्यवस्थापन कक्ष/टे-१ /कोरोना/सीआर-

दि. २३/०३/२०२०

वाचाः-१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.कोरोना/२०२०/प्रक्र.५८/ आरोग्य-५ दि.१५.०३.२०२०.

२) साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ चे कलम २,३ व ४

३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना २०२०/ प्रक्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च, २०२०.

**आदेशः-**

ज्याअर्थी संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनी राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४ मार्च,२०२० अधिसुचना निर्गमित केली आहे.

आणि त्याअर्थी साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ मधील तरतुदीनुसार संदर्भात नमुद अधिसुचना दिनांक १४ मार्च, २०२० मध्ये मला उक्त प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपायोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी संक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे. त्या अधिकाराचा वापर करुन, नांदेड जिल्हयात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजनेचा एक भाग म्हणून नागरीकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी नांदेड जिल्हयातील सर्व बँकातुन होणारे पीक विमा, कर्ज वाटप व शासनाकडून देण्यात येणारे सर्व अनुदानाचे वाटप दि.३१.०३.२०२० पर्यंत बंद करण्याचे याव्दारे आदेशित करीत आहे. बँकाचे इतर व्यवहार या पूर्वी दिलेल्या निर्देशांची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन नियमितपणे चालु राहतील.

सदर आदेशाचे पालन न करणा-या कोणतीही व्यक्ती,संस्था अथवा समुह हे आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ आणि भारतीय दंड संहिता १८८ नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व कारवाई करण्यात येईल.

**(डॉ. विपीन इटनकर)** भा.प्र.से.
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई.

२) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद

**प्रतिलीपी, माहिती व कार्यवाहीस्तव**

१) आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
२) पोलीस अधीक्षक, नांदेड
३) व्यवस्थापक जिल्हा अग्रणी बँक, नांदेड
४) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नांदेड
५) सर्व उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
६) सर्व तालूका दंडाधिकारी, नांदेड जिल्हा

**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**